महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail : desk4a@ dtemaharashtra.gov.in Internet:http/www.dtemaharashtra.gov.in

क्र.२अ/एडीएम/शास्ती/२०२१/५७८ दि. 18 MAR 2021

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

**विषय : विद्यार्थ्यांना मुळ शैक्षणिक कागदपत्रे परत करण्याबाबत.**

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१९/७७८, दि.५ ऑक्टोबर २०१९

२. शासन पत्र क्र.बैठक-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४ दि.०८/०२/२०२१

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकिर्ण २०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४, दि.०३.०१.२०१९ अन्वये कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यासाठी जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/ पदवी व इतर कागदपत्रे त्यांने परत मागणी केल्यास ती ३ दिवसाच्या आत परत करण्याची कालमर्यादा विहीत करण्यात आलेली आहे. या संदर्भात संचालनालयाच्या संदर्भ क्र.१ वर नमूद केलेल्या पत्रामध्ये नमूद केलेल्या सूचना आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना देण्याबाबत आपणांस कळविण्यात आलेले आहे.

तथापि व्यावसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांने मध्येच शिक्षण सोडल्यास त्यास शैक्षणिक वर्षाचे पूर्ण शुल्क भरण्याची सक्ती करण्यात येते व त्याखेरीज त्याची मूळ कागदपत्रे त्याला परत करण्यात येत नाहीत अशा स्वरुपाच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, त्यामुळे आपल्या अधिनस्त संस्थांना दि.०३.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या पुन्हा सूचना देण्यात याव्यात तसेच दि.०३.०१.२०१९ नंतर प्रवेश नियमातील तरतूदींचा भंग झाल्यामुळे २०१५ च्या अधिनियमातील तरतूदीनुसार किती संस्थांना शास्ती लावण्याचा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणांकडे सादर करण्यासाठी आपल्या विभागाने पाठविला आहे याची माहिती सादर करावी.

(प्रमोद नाईक)

सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : मा.अवर सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२ यांना त्यांच्या संदर्भ क्र.२ च्या पत्राच्या अनुषंगाने माहितीकरीता सादर (लक्षवेध : श्री.संजय औ.धारुरकर, अवर सचिव)

\\192.168.1.9\Desk2a\Desk 2a- 3 (khanolkar)\Letter to R.O.20.doc

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

दूरध्वनी क्र ०२२-२२०४०९३५.
Email ID : sanjay.dharurkar@nic.in

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

क्रमांक : बैठक-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४

दिनांक : ८ फेब्रुवारी,२०२१

पत्र प्राप्त झाले
9 FEB 2021
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

विषय : विद्यार्थ्यांना मूळ शैक्षणिक कागदपत्रे परत करणेबाबत.
संदर्भ : शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/ तांशि-४, दिनांक ३ जानेवारी,२०१९

शासन परिपत्रक दिनांक ३/१/२०१९ अन्वये, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन ), अधिनियम, २०१५ मधील कलम २०(१) मधील तरतूदी विचारात घेऊन या अधिनियमाच्या कलम २३ व्दारे प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक २४/४/२०१७ व दिनांक ५/६/२०१८ च्या अधिसूचनेतील प्रवेश नियमाच्या नियम १५ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना देण्यात आल्या आहेत. संस्था या प्रवेश नियमातील तरतूदीचे पालन करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांविरुध्द अधिनियमाच्या कलम २० नुसार शास्ती करण्याचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा, असेही परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात आले आहे.

२. परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना स्वयंस्पष्ट आहेत . तथापि, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने मध्येच शिक्षण सोडल्यास त्यास शैक्षणिक वर्षाचे पूर्ण शिक्षण शुल्क भरण्याची सक्ती करण्यात येते व त्याची मूळ कागदपत्रे त्याखेरीज परत करण्यात येत नाहीत, अशा स्वरुपाच्या

काही तक्रारी ई-मेल व्दारे शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे दिनांक ३/१/२०१९ च्या परिपत्रकातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांना पुन्हा देण्यात याव्यात. तसेच दिनांक ३/१/२०१९ नंतर प्रवेश नियमातील तरतूदींचा भंग झाल्यामुळे २०१५ च्या अधिनियमातील तरतूदीनुसार किती संस्थांना शास्ती लावण्याचा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला आहे याची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. सोबत श्रीमती सुनिता दिनकर साळुंखे यांचा दिनांक २२/१२/२०२० चा तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी जोडला आहे.

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन